अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org

अपील क्र.६९/२०२४

जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/४९९० दि. २३/०७/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/६९/२०२४

श्री.प्रविण गायकवाड,
बी-६०७, मॅजेस्टिक मॅनहटॅन सोसा., वाघोली,
पुणे-४१२२०७

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---------------- प्रतिवादी

श्री.प्रविण गायकवाड, बी-६०७, मॅजेस्टिक मॅनहटॅन सोसा., वाघोली, पुणे-४१२२०७ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.३/५/२०२४ रोजी ऑनलाईन मे.महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचेकडे ऑनलाईन (UDDEP/R/2024/60538) अर्ज दाखल केला आहे. नगर विकास विभागाने जा.क्र.माअअ-२०२४/प्र.क्र.२०६/नवि-२२ कद.६/५/२०२४ रोजी पुणे महानगरपालिकेकडे वर्ग केला आहे. अर्ज महापालिका आयुक्त कार्यालयास प्राप्त होवून जा.क्र.स्वागत/१५४८ दि.१६/५/२०२४ ने आस्थापना विभागाकडे वर्ग केला आहे. आस्थापना विभागास आ.क्र.२३१५, दि.१६/५/२०२४ रोजी प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/२६४४, दि.१४/६/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ०३/५/२०२४ | १६/५/२०२४ | १५/६/२०२४ | १४/६/२०२४ | ० |

माहिती अधिकार अर्जात दिलेली माहिती अर्धवट, चुकीची व दिशाभूल करणारी आहे असे नमूद करुन दि.२७/६/२०२४ रोजी (आ.क्र.४८५८, दि.२७/६/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २७/६/२०२४ | २७/६/२०२४ | १४/७/२०२४ | होय | -- |

सदर अपिलाची सुनावणी दि.१६/७/२०२४ रोजी दुपारी ३.०० वा. आयोजित करण्यात आली असल्याचे जा.क्र.उप आयुक्त (सा.प्र.)/आस्था/३५०४, दि.९/७/२०२४ रोजी कळविण्यात आले आहे. सुनावणीस **अपिलार्थी अनुपस्थित होते. ईमेलद्वारे दि.१५/७/२०२४ लेखी म्हणणे दाखल केले आहे.** माहिती देताना श्री.अविनाश वंजारी, जन माहिती अधिकारी होते. श्री.अविनाश वंजारी सुनावणी वेळी वैद्यकिय रजेवर असल्याने श्रीमती योगिता जायभाई या विद्यमान जन माहिती अधिकारी असून त्या सुनावणीस उपस्थित होत्या.

## विवेचन

माहिती अधिकार अर्जात दिलेली माहिती अर्धवट, चुकीची व दिशाभूल करणारी आहे. कलम २(च) नुसार माहिती लपविण्यात आली. कलम ६ नुसार अर्ज तपासला नाही. कलम ७(३) व कलम (५) नुसार कारवाई झाली नाही. कलम ११ नुसार कारवाई केली नाही. कलम १८ (ड) नुसार खोटी माहिती देवून कर्तव्यात कसूर करण्यात आली आहे. कलम २०(१) व २०(२) नुसार कारवाई करण्यात यावी, असे नमूद करुन दि.२७/६/२०२४ रोजी (आ.क्र.४८५८, दि.२७/६/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.३/५/२०२४ (आ.क्र.२३१५ दि.१६/५/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे. निलंबन आढावा समितीचे पदाधिकारी, शासन निर्णय, कार्यालयीन परिपत्रके, बैठकीतील निर्णय, व समितीचे कार्यवाहीचे अहवाल इ.बाबत माहिती अधिकार अर्जात मागितली आहे.

सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते. ईमेलद्वारे दि.१५/७/२०२४ लेखी म्हणणे दाखल केले आहे. त्यातील मुद्दे पुढीलप्रमाणे:-

1. प्रथम अपील सुनावणीस काही कौटुंबिक कारणामुळे उपस्थित राहू शकत नाही.
2. मला दिनांक ०३.०५.२०२४ च्या (UDDEP/R/2024/60538) माहिती अधिकार विनंती अर्जाच्या संदर्भात दि १४ जुलै २०२४ रोजी दिलेली माहिती अर्धवट, चुकीची व दिशाभूल करणारी आहे.
3. मी माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ३ अन्वये अर्ज केला असता मला कलम ७(१) व ७(२) नुसार माहिती मिळाली नाही. कलम ४ नुसार माहिती अद्यावत केली नसल्याने मला विहित मुदतीत माहिती मिळाली नाही.

4. कलम २ (च) च्या व्याख्येत माहिती बसत असताना जाणीवपूर्वक माहिती पासून मला वंचित ठेवल्याने मी जोडपत्र 'ब' कलम १९(१) नुसार प्रथम अपील केले आहे. त्यानुसार आपला ई मेल दिनांक १० जुलै २०२४ रोजी मिळाला
5. मूळ अर्जातील मुद्दा १ ते ५ ची माहिती. सर्व दस्तावेजाच्या प्रती माहिती अधिकार (लोगो) शिक्याने सांक्षांकित करून मिळाव्यात.
6. मला आज अखेर मिळू शकली नाही, माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम २ (च), कलम ५(४), कलम ५(५) आणि कलम ६, कलम ७ (१) आणि कलम ७ (२) चा भंग झाला आहे. विहित मुदतीत माहिती मिळू शकली नाही त्यामुळे माहिती अधिकार नियमांचा जन माहिती अधिकारी यांनी भंग केला आहे. त्यामुळे कलम २०(१), कलम २०(२)नुसार कारवाई होण्याबाबत योग्य ती कार्यवाही करून कलम ७(६) नुसार मला माहिती देण्यात यावी.
7. सुनावणी मध्ये जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या माहितीवरून, तसेच मी सादर केलेल्या कागदपत्रानुसार तसेच नैसर्गिक न्यायानुसार आदेश पारित करावे.

मूळ माहिती अधिकार अर्जातील ५ मुद्दांपैकी मुद्दा क्र.१ ते ३ ची माहिती देण्यात आली असून मुद्दा क्र.४ ते ५ ची माहिती दि.१७/१०/२०१४ नुसार नाकारण्यात आली असल्याचे सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले.

अपिलाधिकारी यांनी सुनावणी दरम्यान महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र.संकिर्ण/२०१२/९८९/प्र.क्र. ४७९/सहा, दि.१७/१०/२०१४ कडे लक्ष वेधण्यात आले. शासन परिपत्रकामधील पुढील तरतूदीकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्यांस त्यांच्या **सेवाकालावधीत मिळालेली ज्ञापने, कारणे दाखवा नोटिस, शिक्षादेश, त्यांच्या सेवा नियमांतर्गत कामगिरीबाबतचा अहवाल,** त्यांच्या चल/अचल संपत्तीबाबतची माहिती त्याने केलेली आर्थिक गुंतवणुक बँक किंवा अन्य वित्त संस्थाकडून घेतलेले कर्जे, त्याच्या मुलांच्या विवाहात मिळालेल्या भेटी, आयकर विवरणपत्र यासारखी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यांवर नसल्याचा निर्णय नमूद आहे. जी माहिती प्रकट करणे हे **व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे** अशी माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे.

निलंबन आढावा समितीचे कामकाज हे कायद्याच्या चाकोरीत चालणारे कामकाज असून संपूर्ण गोपनीय स्वरुपात चालते सबब, माहिती देणे शक्य नाही. तसेच, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती देताना ३१ पाने शुल्क न आकारताना विनामूल्य देण्यात आले असल्याने कलम ७(१) चा भंग झाला आहे. सबब, श्री.अविनाश वंजारी, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर करावा, असे अपिलाधिकारी यांनी नमूद केले. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

# आदेश

१) जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांनी दिलेली माहिती योग्य आहे.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांनी कलम ७(१) चा भंग केला आहे. सबब, याबाबत आदेश प्राप्तीनंतर १५ दिवसात खुलासा सादर करावा.

३) सदर अपिल क्र.६९/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

P.Patil 23.7.24

(प्रतिभा पाटील)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.



3